# संगीत संन्यस्त खड्ग
आणि
# बोधिवृक्ष

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**संगीत संन्यस्त खड्ग आणि बोधिवृक्ष : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# संगीत संन्यस्त खड्ग
## आणि
# बोधिवृक्ष

# संगीत संन्यस्त खड्ग

# संगीत संन्यस्त खड्ग

## अंक पहिला

### प्रवेश १ ला

(तपोवनातील देवीचे देऊळ. नाचाच्या मुली गाणें गातात.)

**राग–** यमन, **ताल–** एकताल. **चाल–** (हाला। मधुमद विलसित)

**किती तरि सुललित सहज–गीति। तार न बहु**
**ताणी।।धु.।। ताणिशि तनु–बीन तुटे शिथिल**
**तरी गीति नुठे, अति तें तें करित हानी।।१।।**

(मुली गात जाताच सिद्धार्थ गौतम आणि कौंडिन्य प्रवेशतात)

**सिद्धार्थ –** कौंडिन्य, हेंच तें गान! अैकलेंस ना? ह्या नर्तकी हें जें गाणें म्हणत आता गेल्याना, तें गाणें, मी पूर्वी अेकदा अैकलें होते. आणि तुला आश्चर्य वाटेल पण नर्तकींच्या ह्या गाण्याने अेखाद्या गूढमंत्रासारखा माझ्या हृदयात दिव्य प्रकाश पाडला. आणि त्या प्रकाशात मी या तपोवनाच्या घोर अंधारातून निर्वाणाचा मार्ग काढीत बोधिवृक्षाच्या तलापाशी जाअू शकलो. स्वत:च्या देहास नि अिंद्रियांस छळून, पीडून, नाशून त्यांचे बलिदान केल्याने मोक्ष मिळतो असें सांगणाऱ्या तपोमार्गात काय तथ्य आहे तें त्या तपोमार्गाचा स्वत: अनुभव घेअून प्रत्यक्ष पहावें म्हणून आम्ही या निरंजना नदीचे तीरी घोर देहदंडन करीत होतो हे प्रसिद्धच आहे. कौंडिन्य, या सकल जगतास जन्म–मृत्यु–जरा–व्याधि या चार महादु:खांपासून मुक्त करण्याचे काही साधन आहे का! अशी तळमळ लागून मी जेव्हा प्रतिज्ञा केली की–

(**चाल–** पीतनके) **ताल–** त्रिताल

**विमुक्त करूं हे! आर्त जगत! पासुनि जन्ममरणा।।धु.।।**
**साधन शोधाया। राज्य स्वजन अरे प्राणही।**
**सोडीन लोक शोक हरणा।।१।।**

अशा प्रबळ निश्चयाने मी या दुःखमय संसाराचा त्याग करून, माझें शाक्य राज्य, माझी तरुण भार्या देवी यशोधरा, माझा नवजात, तनय राहुल–माझें सर्वस्व सोडून मी या वनात येऊन राहिलो, तेव्हा मी दिवसा एकेक दाणा खाऊन रहाण्यापर्यंत अनेक प्रकारचीं अुपासतापासांचीं व्रतें केलीं. पण मला ज्ञान होअीना. शेवटी मी आसन्न मरण होअून रात्रंदिवस पडलो. परंतु त्यामुळे होती ती विचारशक्ति देखील नष्ट झाली. मग अधिक ज्ञान मिळण्याची गोष्टच दूर. अितक्यात अेक दिवस नाचाच्या मुली हें गाणें म्हणत त्या मार्गाने गात गेल्या की ‘वीण्याची तार अगदी ढिलाअू नकोस, नाहीतर गीत अुपजणार नाही. फार ताणूही नकोस, नाही तर वीणाच तुटेल.’ तीच स्थिति अिंद्रियांची, या तनुवीणेची. हीं अिंद्रियें अगदी लाडावाल तरीही शांतिसंगीतास आंचवाल, त्यांस फार छळाल तरीही शांतिसंगीतास मुकाल. तर या अिंद्रियाश्वांची योग्य ती जोपासना करून पण अुत्तम स्वारासारखी त्यांची वागुरा हातात ठेवून जर त्यांचा अुपयोग करून घ्याल तर ती सहजावस्थाच तुम्हांला ज्ञानमार्गाचा प्रवास सुखकर करील, व अंती निर्वाण प्राप्त करून देअील. हा सिद्धान्त मला पटला आणि मी तें देहपीडन सोडलें. अन्न स्वीकारलें आणि युक्ताहार–विहार होत्साता त्या बोधिवृक्षाच्या छायेखाली समाधियुक्त ज्ञानमार्गाने निर्वाणाचें परमसुख अनुभवू शकलो. कौंडिन्य, जो हिंसामय यज्ञमार्गासंबंधी सिद्धान्त तोच या देहदंडनात्मक तपोमार्गाविषयीही सत्य आहे काय? सांग पाहू! हिंसामय यज्ञमार्गाविषयी तथागत बुद्धाचा सिद्धान्त काय तो सांग पाहूं!

**कौंडिन्य –** हे भगवान् बुद्धदेवा, आपला हिंसामय यज्ञाविषयीचा सिद्धान्त मी संपूर्णपणे आकलन केला आहे. प्लवा ह्येते अदृढाः यज्ञरूपाः। भाराभार शेणफाटे गोळा करा, त्याची अेक थोरली होळी करा, आनंदाने बागडणाऱ्या बिचाऱ्या कोकरास आणि वासरांस त्यांचे पाय बांधून, भाजी कापावी तसे त्यांचे गळे, हृदय, वसा, नसा गंभीरपणे मंत्र म्हणत चराचर कापा, आणि त्यांच्या मांसांच्या निरनिराळ्या तुकड्यांना हा अिंद्राचा, हा मरुताचा, हा वरुणाचा म्हणून आगीत रक्ताच्या धारांसह



जाळीत बसा! अशा या रक्ताळलेल्या यज्ञाने जर देवता प्रसन्न होतात तर त्या कसाअीखान्याने कां प्रसन्न होअू नयेत! हें कर्मकांड नव्हे, हें हत्याकांड आहे आणि याने देव जर खरेच प्रसन्न होत असतील तर ते देव नसून दैत्यच असले पाहिजेत! कोकरांना आणि वासरांना मारलें म्हणजे म्हणे मनुष्यास मोक्ष मिळतो! कोण हें खूळ! पुन्हा यज्ञाने जो स्वर्ग मिळतो त्यातही, दुःखपूर्ण देवांच्या कथाच सांगतात की देवही मत्सर, क्रोध, भय, दुःख आणि असंतोष ह्यांच्यापासून मुक्त नसतात. पण भगवान्, पशूंच्या बलिदानाने देवपितर संतुष्ट होअून मोक्ष मिळतो ही क्लृप्ति ज्यांनी काढली ती जगास केवळ फसविण्यासाठीच काढली की काय?

**सिद्धार्थ –** नाही. त्यांनी हेतुपुरस्सर जगाची फसवणूक केली असे मी म्हणत नाही. ही त्यांची प्रामाणिक भूल होती. चिरंतन आणि अमर असें जगांतील मूलतत्त्व शोधण्याच्या आणि अशेष दुःखांपासून मुक्त होण्याचें साधन अुपलब्ध करण्याच्या मनुष्यजातीच्या प्रशंसनीय प्रयत्नांची ती अेक पायरी होती. तो अेक बुद्धीचा भ्रम होता. पण अनुभवाने आणि विचाराने तो भास निरसन झाल्यावरही कोणचा शहाणा मनुष्य त्याला तसाच चिकटून राहील? देहदंडनात्मक तपाने मनुष्याच्या अवयवांवर आणि शक्तीवर निरनिराळे प्रयोग केले असता तीं काय रूपांतरे घेअू शकतात हें फार फार तर शिकता येअील; पण सकल दुःखांपासून मुक्त होण्याशीं आणि आत्म्याच्या चिरंतन शांतीच्या प्राप्तीशी त्यांचा काहीच प्रत्यक्ष संबंध नाही. हिंसात्मक यज्ञ वा देहदंडनात्मक तप हा निर्वाणाचा मार्ग नव्हे. निर्वाणाचा मार्ग म्हणजे तृष्णानाश आणि साधना म्हणजे अेवढीच की आपल्या निष्ठेप्रमाणे

**अकुशलस्याकरणं कुशलस्योपसंपदा।**
**सचित्तपरियादपनं अेतद् बुद्धानुशासनम्।।**

**कौंडिन्य –** या तपोवनांत आपण मला देहदंडनाचे अद्भूत प्रकार दाखविणार होतात ना?

**सिद्धार्थ –** ये असा आंत ये (पडदा अुघडतो.) हे पहा, डोक्याचे केसापासून तों पायाचे नखापर्यंत, प्रत्येक प्रसंगागणिक देहदंडन प्रकार! हे केशी पहा. अेकही केस काढणें ह्यास हे पाप समजतात. डोक्याचे केस पाठीवर आणि तोंडावर, नाकाचे मिशीत आणि मिशीचे दाढीत, दाढीचे पोटावर, खाकेचे बरगड्यावर, अेखादें चवाळें पांघरावें तसें हें केसाळ अंग पहा!

**कौंडिन्य –** पण हे कोण रागारागाने आपल्या केसांच्या जटा अुपटीत आहे? याला अेखाद्या दु:खाची बातमी कळली कीं काय?

**सिद्धार्थ –** नाही. तो अेक केशरक्षक पंथाच्या अगदी अुलट असणाऱ्या केशलुंचक पंथाचा पर्याय आहे. अंगावर अेकही केस राहूं देणें ह्यास हे पाप समजतात. त्यांतही ते केस क्षुराने काढून खरा देहदंड होणार नाही म्हणून प्रथम केस वाढवून, अशा मुठीच्यामुठी हातांनी हिसडून हे लोक केसन् केस अुपटून टाकतात.

**कौंडिन्य –** हे कोण, हात अुभारून कोणास बोलावीत आहेत की काय?

**सिद्धार्थ –** तें नंतर. प्रथम हें पहा, हे हात जसे जन्मत: लोंबकळत सुटले तसेच जन्मभर ठेवणें पुण्य समजतात. हे हात वर असा करीतच नाहीत. त्यामुळे त्यांचीं हाडें क्षीण होअून हात पुढे मागे वर होतच नाहीत. यांचे अुलट हें पहा खरें तप. म्हणजे हात निसर्गाविरुद्ध सारखे वर धरणें असे यांचे मत. हे दोन्ही हात सारखे वरच ठेवल्याने सुकून लाकडासारखे झाले आहेत. ह्या परस्पविरुद्ध मार्गातील कोणता खरा पुण्यप्रद तें कसें सांगणार!

**कौंडिन्य –** पण हें कोण असे भुअी चाटीत आहेत?

**सिद्धार्थ –** हे मृगव्रताचं अनुष्ठान करीत आहेत. हातापायांवर पशूसारखेच हे नेहमी चालतात. त्यांच्यासारखेच निजतात, बसतात आणि भुअीवरील गवतपाला खाअून जगतात. हे अगतिक पहा. अेके ठिकाणी नित्याचेच बसले आहेत. पावसात गाळ साचून त्यांचेवर वारुळें बनतात, त्यांत सर्प येतात, कोणी तोंडात काही घातलें तर जगतात, अेकादे वेळी सर्प त्यावर प्रीति करतात, अेखादे वेळी डसून मारतात. हे सतत गतिक पहा... त्या अगतिकाच्या अगदी अुलट. हे सतत चाललेले असतात. अेका ठिकाणी राहणें तरी भोवती गरगर फिरत राहतील, पण गति बंद ठेवणार नाहीत. त्यांना पुढे पुढे चालता चालताच झोप घेण्याची किंवा झोपेतही चालण्याची सवय होते. अगदी परस्पर विरुद्ध नियम पाळणारे तपस्वी आपापल्या नियमांस सारख्याच हट्टाने पुण्यकारक आणि मोक्षकारक समजतात. आता जर गतिव्रत पुण्य असेल तर अगति–व्रत पाप असलें पाहिजे आणि अगति पुण्य असेल तर सतत गति पाप! या दोघांत कोणी तरी अेक निश्चयानेच चुकतो आहे आणि बहुधा दोघेही चुकताहेत, आनंदाची गोष्ट अेवढीच की हे महानिग्रही तपस्वी त्यांच्या अगदी अुलट निष्ठेच्या साधकासही विरोध न करता शेजारी आपापली अिष्ट साधनें आचरीत आहेत. कौंडिन्य व्रताचे किती



प्रकार सांगू तुला! नुसत्या खाण्याचे पन्नास प्रकार. कोणी रसेंद्रिय मारण्यास प्रत्येक पदार्थात अत्यंत कडवट रस पिळून खातात, कोणी निरशन व्रती. ते काहीच खात नाहीत तर कोणी सर्वाशन व्रती. ते भुकेचे वेळी जें समोर दिसेल तें खाणें पुण्याकारक समजतात. मलमूत्र समोर दिसलें तरी देखील साम्य बुद्धीने मटामट खातात. कोणी पंचाग्नीत सतत बसतात तर कोणी थंड पाण्यात सतत राहतात. हा बघ. ह्या देहदंडक तपस्व्यात अत्यंत प्रमुख म्हणून गाजला. खडावांस खालून खिळे मारून त्यावर पाय देताना त्यांचीं अणकुचीदार अग्रें यानें आपल्या पायांत भांसकून घेतलीं आहेत. हा तसा चालतो. मिरच्यांची धुरी पेटवून स्वत:स टांगून घेअून हा डोळा धुपवतो. ह्याने तापल्या तव्यावर आपल्या जननेंद्रियास जाळून टाकलें. आणि आता तीं देहदंडाची दु:खें कमी वाटून तो परम निग्रही तपस्वी काटे खात आहे व सुळे लावलेल्या शय्येवर सदोदित पडून राहणार आहे. आणखी–

**कौंडिन्य –** पुरें झालें. हे बोधिसत्त्वा सिद्धार्था, मला या अघोरी पंथांचे अधिक माहितीची मुळीच आवश्यकता नाही!

**सिद्धार्थ –** जगांत मनुष्याने पाप केलं तर नरकात त्याला असे भयंकर दंड भोगावे लागतात असें म्हणतात, पण पापाची जी नारकी शिळा तिलाच पुण्य समजून हे निष्पाप लोक त्या यातना आपण होअून अिहलोकीच भोगीत आहेत. आणि या अशा नरकाच्या यातना सोसणें हा स्वर्गाचा सोपा मार्ग, मुक्ति, मोक्ष समजतात. हा केवढा बुद्धिभ्रम आहे पहा! कौंडिन्य, तुझ्या आअीचें तुजवर प्रेम होतें का? ती दयाळू होती का?

**कौंडिन्य –** महाराज, ती फार मायाळू होती. आअीच ती! तिचें प्रेम काय वर्णावे?

**सिद्धार्थ –** तर मग तू अुपाशी राहिलास, गवत खाल्लेस, चुलीत हात भाजून घेतलास म्हणजे तिला आनंद होअी, का तू पोटभर जेवावे, धष्टपुष्ट आणि समाधानी असावें, अशी तिची अिच्छा असे?

**कौंडिन्य –** अर्थात् मी खाअून पिअून सुखी, आनंदी, निरोगी असावें अशी––

**सिद्धार्थ –** बरें. कौंडिन्य–– हे लोक देवास दयाळू व प्रजेचा मातापिता समजतात नाही! तर मग आपल्या भक्तास अुपासाने कृश करून, तापल्या तव्यावर भाजून तो दयाळू पितामाता प्रसन्न होअील, हें शक्य तरी आहे का? जिवाचा जितका